# श्री महालक्ष्मी को–ऑप. बँक लि., कोल्हापूर

मुख्य शाखा : श्री भवन, १६७ बी, मंगळवार पेठ, कोल्हापूर–४१६०१२
फोन नं. ०२३१–२५४५५२/२५४७१५६

## विक्रीची जाहिर नोटीस (निविदाद्वारे)

दि सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ कलम १३(१२) व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या रुल ८ व ९ श्री महालक्ष्मी को–ऑप. बँक लि., कोल्हापूर १६७, बी, श्री भवन, मंगळवार पेठ, कोल्हापूर यांनी खाली नमूद कर्जदार यांना खाली नमूद केलेल्या मिळकतीच्या तारणावर कर्ज पुरवठा केलेला असून, सदर कर्ज एन.पी.ए. झालेले असल्याने बँकेने दि सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ कलम १३(२) प्रमाणे मागणी नोटीस कर्जदार, सह कर्जदार, मान्यतादार व जामीनदार यांना **दिनांक १८/११/२०२४** रोजी दिली होती व त्या नोटीसीप्रमाणे रक्कम न भरल्याने बँकेने याच कायद्याच्या कलम १३(४) प्रमाणे **दिनांक ०५/०३/२०२५** रोजीची ताबा नोटीस दिली होती व त्याप्रमाणे कर्जास तारण असलेल्या खाली नमुद मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा **दिनांक २१/०३/२०२५** रोजी घेणेत आला. आता, सदर कायद्याच्या कलम १३(१२) व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या रुल ८ व ९ प्रमाणे खाली नमूद केलेल्या तारण मिळकत विक्री करणेबाबत लखोटाबंद निविदा मागविणेत येत असून, सदर मिळकत या ''जशी आहे तशी व आहे त्या परिस्थीतीत'' या तत्वावर विकणेत येणार आहेत. सदर मिळकत ज्यांना खरेदी करणेची इच्छा आहे त्यांनी लखोटाबंद निविदा खालील नमूद अधिकृत अधिकारी श्री महालक्ष्मी को–ऑप. बँक लि., कोल्हापूर रु. ४,६०,०००/– (अक्षरी रुपये चार लाख साठ हजार फक्त) इतक्या इसारा रक्कमेसह डिमांड ड्राफ्ट/पेऑर्डर/ऑनलाईन पध्दतीने श्री महालक्ष्मी को–ऑप. बँक लि., कोल्हापूर यांचे नावे बँकेच्या मुख्य कार्यालयात **शुक्रवार दिनांक १७/१०/२०२५** पर्यंत पाठविणे आवश्यक आहे. सदर निविदा **शनिवार दिनांक १८/१०/२०२५** रोजी दुपारी १२.०० वाजता श्री महालक्ष्मी को–ऑप. बँक लि., कोल्हापूर मुख्य कार्यालय,कोल्हापूर येथे उघडण्यात येतील. सदर कर्ज प्रकरणासंबधीत बँकेकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे पडताळणी करिता कार्यालयीन वेळेत बँकेच्या ताराबाई पार्क, कोल्हापूर शाखेत उपलब्ध असतील. सदरची नोटीस www.smcbl.in या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

| **कर्जदार, सह कर्जदार, मान्यतादार व जामीनदार यांची नावे** | **दिनांक ३१/०८/२०२५ रोजी येणेबाकी रक्कम** |
|---|---|
| **१) श्री. शिरतोडे गोरखनाथ महादेव (कर्जदार)**<br>**प्रो.प्रा. आर. जी. प्रोजेक्ट्स**<br>आर.एस.९०३/५/१ ,फ्लॅट नं.बी–३०२, पॅलेस ऑर्किड अपार्टमेंट,<br>पोलो मैदान समोर, रमण मळा, कोल्हापूर–४१६००३.<br>**२) मंडले संपतराव आण्णा (सह कर्जदार) (मयत) तर्फे वारस**<br>**१) सौ. शिरतोडे पुष्पलता गोरखनाथ**<br>आर.एस.९०३/५/१, फ्लॅट नं.बी–३०२, पॅलेस ऑर्किड अपार्टमेंट,<br>पोलो मैदान समोर, रमण मळा, कोल्हापूर–४१६००३.<br>**ब) श्रीमती मंडले शारदा संपतराव**<br>**क) श्री. मंडले अमोल संपतराव**<br>**ड) श्री. मंडले अतुल संपतराव**<br>अ.क्र.२) ब, क व ड रा. रामोशी गल्ली, मु.पो. बोरगाव<br>ता– वाळवा, जि.– सांगली–४१५४१३<br>**३) सौ. शिरतोडे पुष्पलता गोरखनाथ (जामिनदार)**<br>आर.एस. ९०३/५/१ ,फ्लॅट नं.बी–३०२,पॅलेस ऑर्किड अपार्टमेंट,<br>पोलो मैदान समोर, रमण मळा, कोल्हापूर–४१६००३.<br>**४) श्री. कदम अनिल बाळासो (जामीनदार)**<br>कदमवाडी पोस्ट ऑफीस, मु.पो. इस्लामपूर<br>ता– वाळवा जि– सांगली ४१५४०९<br>**५) श्री. मंडले अमोल संपतराव (मान्यतादार )**<br>**६) श्री. मंडले अतुल संपतराव (मान्यतादार )**<br>अ.क्र.५ व ६ रा.रामोशी गल्ली, मु.पो. बोरगाव<br>ता– वाळवा, जि– सांगली–४१५४१३ | कर्ज खाते क्र.३०४/२७<br>रु. ८२,८५,९२४=०५ (अक्षरी ब्याऐंशी लाख पंच्याऐंशी हजार नऊशे चोवीस आणि पैसे पाच फक्त) तसेच वरील येणे रक्कमेवर ता. ०१/०९/२०२५ पासूनचे व्याज व इतर खर्च |

**विक्री करावयाच्या मिळकतीचे वर्णन**

**मौजे आवशी, ता– खेड, जि– रत्नागिरी येथील रि.स. नं. १३/अ/२१ यांचे एकुण क्षेत्र क्षेत्र १५४०० चौ.मी. या क्षेत्रावर बिगरशेती प्लॉट पैकी खालील प्लॉट मिळकती**

१) रि.स. नं. १३/अ/२१/२६ या मधील प्लॉट नं. १० याचे एकूण क्षेत्र १३४ चौ.मी. या मिळकतीच्या चतु:सिमा पुढीलप्रमाणे–**पुर्वेस**– प्लॉट नं. ११, **पश्चिमेस**– प्लॉट नं.९, **दक्षिणेस**– रस्ता, **उत्तरेस** –सदर प्लॉटची हद्द

२) रि.स. नं. १३/अ/२१/२४ या मधील प्लॉट नं. ११ याचे एकूण क्षेत्र १३४ चौ.मी. या मिळकतीच्या चतु:सिमा पुढीलप्रमाणे–**पुर्वेस**– प्लॉट नं.१२, **पश्चिमेस**– प्लॉट नं.१०, **दक्षिणेस**– सदर प्लॉटची हद्द, **उत्तरेस** – रस्ता

३) रि.स. नं. १३/अ/२१/२३ या मधील प्लॉट नं. १२ याचे एकूण क्षेत्र १३४ चौ.मी. या मिळकतीच्या चतु:सिमा पुढीलप्रमाणे– **पुर्वेस**– प्लॉट नं.१३, **पश्चिमेस**– प्लॉट नं.११, **दक्षिणेस**– सदर प्लॉटची हद्द, **उत्तरेस** – रस्ता

(मिळकतीची राखीव किमंत रु.४६,००,०००/– (रुपये सेहेचाळीस लाख आकरा हजार फक्त)

### लिलावाच्या अटी व शर्ती :–

**१)** सदर मिळकत जास्तीत जास्त किंमत देणाऱ्यास विकली जाईल. तथापी, अधिकृत अधिकारी यांना कोणतेही करण न देता निविदा स्विकारणेचा अगर नाकारणेचा अधिकार आहे. विक्री रद्द करणेचा/स्थगीत ठेवणेचा अधिकार आहे., तसेच या शर्ती व अटी मध्ये कोणतेही कारण न देता बदल करणेचा अधिकार आहे. **२)** सदर मिळकतीसंबंधी विक्रीच्या इतर अटी व शर्ती बँकेच्या मुख्य कार्यालयात सुट्टीचा दिवस सोडून इतर कोणत्याहि दिवशी पहावयास मिळेल. **३)** इतर माहिती व टेंडर फॉर्म बँकेच्या मुख्य कार्यालयात सुट्टीचा दिवस सोडून इतर कोणत्याही दिवशी पाहावयास मिळेल. **४)** टेंडर फॉर्मची किंमत रु. १,०००/– + जीएसटी (अपरतावा) राहिल. इसारा रक्कम रु.४,६०,०००/– (अक्षरी रुपये चार लाख साठ हजार फक्त) डिमांड ड्राफ्ट /पे ऑर्डर/ऑनलाइन ट्रान्सफर पद्धतीने निविदेसोबत देणे आवश्यक आहे . इसारा रक्कमेवर व्याज मिळणार नाही. सिलबंद निविदा **शुक्रवार दिनांक १७/१०/२०२५** पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयात वर नमूद पत्त्यावर अधिकृत अधिकारी यांचेकडे देणेच्या आहेत. **५)** डिमांड ड्राफ्ट /पे ऑर्डर सिलबंद पाकीटामध्ये न देता स्वतंत्रपणे देणेच्या आहेत. चेक स्विकारला जाणार नाही व ज्याने चेक दिला आहे त्यास लिलावामध्ये सहभागी होता येणार नाही. **६)** जर एकापेक्षा जास्त निविदा एकाच रक्कमेच्या आल्या तर त्या लिलावदारांमध्ये बोली लावणेत येईल व त्यातील सर्वाधिक बोली बोलणाऱ्यास लिलाव बहाल केला जाईल. **७)** अपसेट/राखीव किंमत बँकेद्वारे निश्चित केली आहे. सदर निश्चित केलेली राखीव किंमत ही हस्तांतरण शुल्क आणि मिळकती संबधी संलग्न इतर शुल्कांव्यतिरिक्त आहे. **८)** ज्या व्यक्तीची निविदा स्विकारणेत येईल, त्यास त्याच दिवशी लिलाव रक्कमेच्या २५% रक्कम इसारा रक्कमेसह भरावी लागेल व उर्वरीत रक्कम १५ दिवसांत भरावी लागेल अन्यथा लिलावधारकाने भरलेली रक्कम जप्त केली जाऊन लिलाव नामंजुर होईल व सदर मिळकत पुन्हा लिलावास लावली जाईल व मिळकतीवर कोणताही अधिकार राहणार नाही. सदर रक्कम भरणा करण्याच्या कालावधीमध्ये मुदत वाढ देणेचा सर्वस्वी अधिकार अधिकृत अधिकारी यांना राहिल. **९)** ज्या व्यक्तीच्या नावे लिलाव मंजूर होईल त्यास सर्व प्रकारच्या कायदेशीर पुर्तता झालेनंतर सदर मिळकतीचे सेल सर्टीफिकेट दिले जाईल व त्याप्रसंगी येणाऱ्या मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, इतर खर्च, मिळकतीचे सर्व कर व इतर कायदेशिर खर्च, शासकीय देणी, इतर खर्च, टीडीएस रक्कम स्वतंत्र भरावे लागतील. खरेदिदाराने अशी सर्व रक्कम भरलेनंतर कायदेशीर बाबींची पूर्तता केलेनंतर त्यास मिळकतीचा ताबा दिला जाईल. **१०)** सदर मिळकत ''जशी आहेत तशी व आहे त्या परिस्थीतीत'' विक्री करणेत येईल. बँकेच्या अधिकृत अधिकारी यांना ज्ञात व अवगत माहितीप्रमाणे सदर मिळकतीवर कोणाचाही बोजा नाही. तथापी या लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्या बोलीदारांनी लिलावात काढलेल्या मिळकतीवरील बोजा संबंधी, मालकीहक्कासंबंधी तसेच त्यावरील हक्क, दावे, बाकी, मिळकतीस बाधक असणाऱ्या गोष्टी संबंधी बोली बोलणेपुर्वी स्वतंत्रपणे व स्वत: माहिती घेणे आवश्यक आहे आणि सदर लिलाव प्रकरणामुळे बँकेने कोणत्याही प्रकारचे दायीत्व स्विकारले नाही अगर हे प्रगटन म्हणजे बँकेने कोणाचे प्रतिनीधित्व केले असे समजणेत येऊ नये. सदर मिळकत ही बँकेस ज्ञात अगर अज्ञात असलेल्या माहितीप्रमाणे आणि त्यावर अस्तित्वात असलेल्या व भविष्यात होणाऱ्या बोजासह विकणेत आलेली असून, अधिकृत अधिकारी हे त्रयस्थ पक्षकार यांनी केलेल्या कोणत्याही दाव्यास, मागणीस/बाकी यास जबाबदार असणार नाहीत. **११)** राखीव किंमतीच्या खालील रक्कमेस टेंडर भरले असेल तर बोलीदाराची इसारा रक्कम जप्त केली जाईल व त्यास लिलावामध्ये सहभागी होता येणार नाही. **१२)** बोलीदाराने त्याचे स्वप्रमाणीत पासपोर्ट साइज फोटो, रहिवासी पुरावा जसे आधार कार्ड इ. कागदपत्रे केवायसी साठी सदर टेंडर अर्जासोबत जोडावीत व लिलावाचे वेळी त्याची मुळ कागदपत्रे तपासणीसाठी आणावीत. **१३)** लिलावप्रसंगी कर्जदार, सह कर्जदार, मन्यातादार व जामिनदार यांना हजर राहता येईल.

**<u>RTGS Details</u>** - Account Name: Shri Mahalaxmi Co-Op. Bank Ltd., Kolhapur
**Bank and Branch Name :** IDBI Bank, Assembly Road, Kolhapur
**A/c No. :** 116102000005968 **IFCS :** IBKL0000116

कोल्हापूर
दिनांक : १०/०९/२०२५

अधिकृत अधिकारी
श्री महालक्ष्मी को–ऑप. बँक लि., कोल्हापूर

(इंग्रजी आणि मराठी नोटीसीच्या संदर्भात विसंगती अथवा तफावत असल्यास इंग्रजी नोटीस ग्राह्य धरण्यात येईल)

30x3

NS

**0909-atma1-mahalaxmi co op**